# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## मा. अ प्रभाग समिती
## विशेष सभा
## सभावृत्तांत

दिनांक –०९/०८/२०१७ वेळ : स.१०.३०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेषसभा बुधवार दिनांक ०९/०८/२०१७ रोजी स.१०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत नेमणूक केलेले पीठासीन अधिकारी मा. शेखर गायकवाड (भा.प्र.से) मा. संचालक संचालनालय,भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, भुजल भवन, कृषी महाविद्यालयाजवळ वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. अनुराधा गणपत गोरखे
२. मा.केशव हनुमंत घोळवे
३. मा. बाबर शर्मिला राजू
४. मा. कोमल दिपक मेवानी
५. मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे

याशिवाय श्रीम. आशादेवी मारुती दुरगुडे , क्षेत्रीय अधिकारी, श्रीमती रेखा नारायण गाडेकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, अ प्रभाग समिती, हे उपस्थित होते.

--------

**पीठासीन अधिकारी** सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.**

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** मा. अ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण १(एक) नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. केशव हनुमंत घोळवे | मा. तुषार रघुनाथ हिंगे | मा. अनुराधा गणपत गोरखे |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकूण १ (एक) नामनिर्देशन पत्र मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

| | |
|---|---|
| मा.पीठासीन अधिकारी | मा. अ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एका उमेदवाराचे १ (एक) नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असुन त्यामध्ये मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. केशव हनुमंत घोळवे हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.<br><br>मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. केशव हनुमंत घोळवे हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील कलम ६ नुसार मा. केशव हनुमंत घोळवे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे. |

शेखर गायकवाड (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
संचालक, संचालनालय, भुजल सर्व्हेक्षण आणि
विकास यंत्रणा ,भुजल भवन, शिवाजीनगर, पुणे

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
## मा.अ प्रभाग समिती
## विशेष सभा

ठराव क्रमांक – १
दिनांक –०९/०८/२०१७

विषय क्रमांक – १
विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा. केशव हनुमंत घोळवे या उमेदवाराने एकूण १ (एक) नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल केले असून सदर नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा.केशव हनुमंत घोळवे हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

शेखर गायकवाड (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
संचालक, संचालनालय, भुजल सर्व्हेक्षण आणि
विकास यंत्रणा ,भुजल भवन, शिवाजीनगर, पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/११/कावि/११९५/२०१७
दिनांक :०९/०८/२०१७

9/8/17
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
अ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

C:\Users\admin\Desktop\Prabhag Adhyaksha Election-२०१७\SABHAVRUTANTA\sabhavrutant A WARD.docx

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८
## अ प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१७

अ प्रभाग समिती सभापती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | मा. केशव हनुमंत घोळवे |

दिनांक - ०९/०८/२०१७

शेखर गायकवाड (भा.प्र.से)
पीठासीन अधिकारी तथा
संचालक, संचालनालय, भुजल सर्व्हेक्षण आणि
विकास यंत्रणा ,भुजल भवन, शिवाजीनगर, पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

**मा. अ प्रभाग समितीची मासिक सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक ०१**

**सभावृत्तांत**

दिनांक ०९/०८/२०१७ वेळ : स. १०.४५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समितीची मासिक बुधवार दिनांक ०९/०८/२०१७ रोजी सकाळी १०.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहामध्ये नवनिर्वाचित अध्यक्ष तथा सभापती - मा. केशव हनुमंत घोळवे, अ प्रभाग समिती यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली . सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| २. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| ३. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| ४. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |
| ५. | मा. कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| ६. | मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |

याशिवाय श्रीमती आशादेवी मारुती दुरगुडे - क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, श्रीमती रेखा नारायण गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा, अ प्रभाग समिती हे उपस्थित होते.

सर्वप्रथम नवनिर्वाचित मा.केशव हनुमंत घोळवे - अध्यक्ष तथा सभापती, अ प्रभाग समिती यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारलेनंतर सभा सुरु करणेत आली.

विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक ०२

दि. ९/८/२०१७ विभाग : प्रशासन, अ प्रभाग

सुचक :-मा. अनुराधा गोरखे अनुमोदक :- मा. शितल उर्फ विजय शिंदे

अ प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे दुस-या मंगळवारी सकाळी ११.३० वाजता आयोजित करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

त्यानंतर मा. केशव हनुमंत घोळवे, अध्यक्ष तथा सभापती, अ प्रभाग समिती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती,
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/११/कावि/११९६/२०१७
दिनांक : ९/८/२०१७

9/8/17

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
अ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.